3.2.2



## महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये

Name of conference

- 'बी' नॅक मानांकन प्राप्त
- अनुभवी, तज्ज्ञ व पुरस्कारप्राप्त प्राध्यापक
- शिवाजी विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाचा सर्वोत्कृष्ट रा. से. यो. युनिट पुरस्कार प्राप्त
- आधुनिक उपकरणांसह सुसज्ज प्रयोगशाळा
- माती परीक्षण प्रयोगशाळा चालविणारे एकमेव महाविद्यालय
- ४०० मी. ट्रॅकसह भव्य क्रीडांगण व व्यायामाच्या आधुनिक सुविधा
- पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय
- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र
- विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे सांस्कृतिक व्यासपीठ
- ई बुक, ई-जर्नलसह विपुल ग्रंथसंग्रहयुक्त ग्रंथालय
- वातानुकूलित संगणकीकृत प्रयोगशाळा
- विविध विषयांचे करियर ओरिएंटेड कोर्स उपलब्ध
- शिवाजी विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेत सातत्याने पारितोषिके मिळविणारे 'अमर' नियतकालिक
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासन व हिंदी शिष्यवृत्ती, विकफिल्ड फॉंडेशनची शिष्यवृत्ती सातत्याने प्राप्त
- तज्ज्ञ आणि मान्यताप्राप्त एम.फील. व पीएच.डी. मार्गदर्शक उपलब्ध
- निसर्ग परिचयातून पर्यावरण जागृती



ISBN : 978-93-83796-33-5

॥ ज्ञानम् सर्वार्थ साधनम् ॥

विश्वास शिक्षण प्रसारक मंडल संचलित,
नॅक 'बी' मानांकन

# भक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज

यशवंतनगर, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली. दूरभाष : (ऑ.) 02345-231275/6, प्राचार्य : 9970700471
Website : www.dabncollegechikhali.org

हिंदी एवं मराठी विभाग तथा विश्वविद्यालय अनुदान आयोग, नई दिल्ली के संयुक्त तत्त्वावधान में आयोजित द्वि-दिवसीय राष्ट्रीय संगोष्ठी

# "हिंदी तथा मराठी साहित्य में दलित एवं ग्राम्य चित्रण"



शुक्रवार एवं शनिवार, दि. 18 एवं 19 दिसंबर, 2015

## ***PROCEEDING***

कार्यकारी संपादक : प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील ■ संपादक : डॉ. संजय चिंदगे

## संपादकीय...

साहित्य समाज का प्रतिबिंब होता है साहित्य को समाज से पृथक नहीं किया जा सकता। समाज शब्द का संबंध ऐसे समूह से है, जो समता, एकता, बंधुता, अपनापन, मानवता आदि विशेषताओं से युक्त हो। आज का दौर परिवर्तन का दौर है। मानव का जीवन शिघ्र गती से परिवर्तित एवं विकसित हो रहा है। इस समाज को परिवर्तित करने में समाज सुधारकों, साहित्यकारों, दार्शनिकों, विद्वानों का विशेष योदान रहा है।

समाज का परिवर्तन एवं प्रबोधन करने का कार्य साहित्यकार करता है। समाज विकास में जब बाधाएँ उत्पन्न होती है, तब साहित्यकार अपना साहित्य रुपी शस्त्र उठाकर बाधाओं को समाप्त करके एक स्वस्थ समाज की स्थापना करने की कोशिश करता है।

दलित शब्द को व्यापक रुप में देखा जाए, तो इसका अर्थ है- शोषित, पीडित, अविकसित, व्यक्ति जिसका जीने का अधिकार छिना हो। वर्तमान समय में दलित विमर्श की चर्चा बडे पैमाने में हो रही है। वास्तव में हिंदी साहित्य में दलितों का यथार्थ चित्रण १९८० के बाद मराठी दलित साहित्य की प्रेरणा पाकर हो गया है। इसके पूर्व भी हिंदी साहित्य में दलितों का चित्रण हुआ है। मगर सही अर्थो में हिंदी साहित्य में दलित चित्रण आठवें दशक के बाद ही उभरकर आया है।

भारत देश के अधिकतर लोग ग्राम्य परिवेश में बसे है। अत: ग्राम्य जीवन का साहित्य में चित्रण हो रहा है। हिंदी और मराठी साहित्य में दलित एवं ग्राम्य चित्रण उभरकर आया है। और इस साहित्यपर भूमंडलीकरण का स्पष्ट प्रभाव दिखाई दे रहा है। वर्तमान समय में हिंदी साहित्य में ग्राम्य चित्रण का अभाव पाया जा रहा हैं। इस संगोष्ठी से प्रेरणा पा कर हिंदी, मराठी के नवोदित सर्जन कर्ताओं को नया जोश प्राप्त होगा।

धन्यवाद...

डॉ. संजय चिंदगे





## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोधनिबंधाचे नाव | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | ग्रामीण साहित्य : प्रेरणा व स्वरुप | प्रा. डॉ. एम.एम.हिरेमठ | 1 |
| 2 | ग्रामीण साहित्य | प्रा. शषिकांत शामराव चव्हाण | 5 |
| 3 | ग्रामीण कादंबरी व बदलत्या खेड्याचे चित्रण | प्रा.डॉ.भारती रेवडकर | 9 |
| 4 | जागतिकीकरणाचा ग्रामीण कादंबरीवरील परिणाम | डॉ. प्रकाश दुकळे | 14 |
| 5 | ग्रामीण कवितेतील वाटा – वळणे | प्रा. डॉ. विजय बापू गायकवाड | 18 |
| 6 | सदानंद देषमुख यांच्या ग्रामीण कादबरीतील बोली | प्रा. डॉ. षिवाजी महादेव होडगे | 22 |
| 7 | कृष्णात खोत यांच्या कादबरीतील बोली | प्रा. सुखदेव नारायण एकल | 25 |
| 8 | प्राचीन मराठी वाङ्मयातील ग्रामीणत्व | प्रा. रेखा काषिनाथ पसाले | 29 |
| 9 | जागतिकीकरण आणि मराठीसाहित्यातील स्त्रियांचे लेखन | प्रा.एकनाथ शामराव पाटील | 32 |
| 10 | 'कापूसकाळ' कादंबरीतील ग्रामीण जीवन | डॉ. पांडुरंग गावडे | 35 |
| 11 | "मराठी ग्रामीण कवितेतील पर्यावरण" | प्रा. मीना प्रभाकर गिरडकर | 37 |
| 12 | दलित व ग्रामीण साहित्य : सुमाराची सावली आणि गतिहीन गर्ता | प्रा.डॉ. युवराज देवाळे | 44 |
| 13 | जीवनवादी ग्रामीण कविता | प्रा. डॉ. राजाराम प्र.गावडे | 49 |
| 14 | ग्रामीण साहित्य : ग्रामजीवनाचे सशक्त चित्रण | डॉ. राजेखान शानेदिवाण | 54 |
| 15 | गावठाण मधील ग्रामीण जीवनाचा संघर्ष | प्रा. विठ्ठल नामदेव रोटे | 60 |
| 16 | 'झिम पोरी झिम' : मधील व्यक्तिचित्रणे | डॉ. धनंजय महादेव होनमाने | 63 |
| 17 | सदानंद देषमुख यांच्या कथासाहित्यातील ग्रामीण चित्रण | प्रा.डॉ.सौ.के.व्ही. नलवडे | 67 |
| 18 | गावठाण :– गावपांढरीचे यथार्थ चित्रण | प्रा. एम.वाय.पोवार | 70 |
| 19 | रानखळगी कादंबरीतील समकालीन ग्रामीण वास्तव | प्रा.टिपरसे के.डी | 73 |
| 20 | रा.रं.बोराडे यांच्या 'पाचोळा' कादंबरीतील चित्रण | प्रा.माघवी सुरेंद्र पवार | 77 |
| 21 | इतिहास, ग्रामीण साहित्य आणि निसर्ग | प्रा. डी. आर. पाटील | 82 |
| 22 | १९६० नंतरच्या मराठी कवितेतील ग्रामजीवन | प्रा. दिपक जंगम स्वामी | 84 |
| 23 | 'ऊनपाऊस' कविता संग्रहातील ग्रामीण जीवन | प्रा. डॉ. सुवर्णा नामदेव पाटील | 89 |
| 24 | 'तणकट' कांदबंरीतील ग्रामीण समाज जीवन | प्रा. युवराज आ. पाटील 93 | |
| 25 | व्यंकटेष माडगूळकर व रा. रं. बोराडे यांच्या कथांची पार्श्वभूमी | प्रा. उत्तम करमाळकर | 95 |
| 26 | 'जोगडा' कादंबरीतील ग्रामीण चित्रण | श्री. हिरेमठ एस. जी. गुड्डापूर | 101 |
| 27 | ग्रामीण कादंबरी : एक चिंतन | बरखा आर. सय्यद | 104 |
| 28 | आनंद यादव यांच्या 'गोतावळा' कादंबरीतील निसर्ग चित्रण | संतोष श्रीरंग सणस | 108 |

# ग्रामीण कवितेतील वाटा – वळणे

प्रा. डॉ. विजय बापू गायकवाड
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य
महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली.

## 1) प्रस्तावना :-

ग्रामीण मराठी काव्यातील वास्तवाला स्वानुभवाचे आणि विद्रोहाचे तेज महात्मा फुले आणि सत्यशोधकांच्या वैचारिक पार्श्वभूमीमुळे लाभले. म. फुले, कृष्णराव भालेकर, मुकूंदराव पाटील, मोतीराम तुकाराम वानखेड इ. सत्यशोधकांनी चळवळीच्या प्रसारासाठी लिहिलेल्या कवितेतून ग्रामीण समाजमनातील विद्रोहभाव निर्भिडपणे प्रकट केला. म. फुले स्वतः पुण्यातील मांजरीयेथील त्यांच्या मळयामध्ये आधुनिक पध्दतीने शेती व्यवसाय करीत होते. सर्वच सत्यशोधक ग्रामीण जीवनातील शेतकरी उद्योगाशी निगडीत होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या अनुभवल्या होत्या. शेतकऱ्यांचे शोषण पाहिले होते. शेटजी–भटजींच्या विळख्यातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी त्यांनी लिहिलेली कविता विद्रोही ग्रामीण कविताच होती.

स्वातंत्र्य लढयाच्या उत्तरार्धात सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते महात्मा गांधीच्या चळवळीमध्ये सामील झाले. म. गांधी यांनी स्वातंत्र्यलढयातील शहरातील कार्यकर्त्यांना "खेडयाकडे वळा" असा संदेश दिला. त्यामुळे ग्रामीण संस्कृतीचे अनोखे दर्शन या कार्यकर्त्यांना घडले. ग्रामीण समाजजीवनाचे वेगळेपण त्यांनी लिहिले. ग्रामीण साहित्यामुळे मराठी साहित्य समृध्द होऊ लागले. या ग्रामीण साहित्यप्रवाहातील कवितेने म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतील विद्रोही प्रेरणेतून आकार घेऊन बदलत्या काळानुरूप विविध वाटा वळणे घेत मराठी साहित्यामध्ये ग्रामजीवनातील आदर्श मानवतावादी कृषिसंस्कृतीचा प्रभाव निर्माण केला.

## 2) ग्रामीण कविता – पाऊलखुणा

मराठी ग्रामीण कवितेच्या प्रवाहाबाबत असे म्हटले जाते की तिचा खरा प्रवाह इ.स. 1920 नंतर सुरू झाला. वास्तविक डॉ. आनंद यादव ग्रामीण कवितेच्या स्वरूपाबद्दल म्हणतात. 'ग्रामीण कविता म्हणजे ग्रामीण संवेदनशीलतेने घडविलेली कविता. कलावंताची संवेदनशीलता.... अनुभवाबद्दल विशिष्ट जाणीव निर्माण करीत असते.... ग्रामीण कवितेमध्ये बाहय वास्तव हे खेडे, निसर्ग आणि पारंपारिक मूल्ये यातून घडलेले ग्राम जीवन आहे. त्यात आकार रूपाला आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवा–विषयीच्या प्रतिकिया देत असते, अशी कविता ग्रामीण आहे असे स्थूल मानाने म्हणता येईल.(1)

डॉ. आनंद यादव यांची ग्रामीण कवितेबद्दलची स्थूल संकल्पना लक्षात घेता ग्रामीण कवितेच्या पाऊलखुणा संत वाड्.मयातील एकनाथांच्या भारूडात संत तुकारामांच्या कांही अभंगात, पारंपारिक सोंगी भजनातून जाणवतात. एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन पर्वातील म. जोतीराव फुले कृषीसंस्कृती आणि ग्रामीण समाजजीवनाबद्दल कळवळा असणारे अग्रणी समाज सुधाकर होते. त्यांनी ग्रामीण भागातील कामगार शेतकरी दलित, अपंग, अनाथ आणि स्त्री जीवनाबद्दल न्याय भूमिका घेऊन त्यांना पुरोहितशाही आणि सावकाशाहीतून शोषणमुक्त करण्यासाठी सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून परिवर्तनाचा लढा उभा केला. म.फुले यांनी संतांच्या अभंगासारखीच अखंड, अभंग रचना करून विद्रोही ग्रामजीवनानुभव व्यक्त केला. कुणबी (शेतकरी) यांचे षोशण पाहून संताप व्यक्त करताना ते ब्रिटिश सरकारला उद्देशून म्हणतात.

"चहुकडे भटशाही ।
कुणब्यांची दाद नाही ।।
जोति म्हणे धाव घेई ।।





दुष्टपासूनी सोडवी ।।" (2)

म. फुले यांच्या कुळबीण या अखंड रचनेतून ग्रामीण महिलेचे अपार कष्ट वर्णीलेले आहे. कुळबीण म्हणून तिला हिणविणाऱ्या प्रवृत्तीवर परखड टीका केली आहे. सत्यशोधक चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांनी ग्रामीण जीवनानुभूतीतून चळवळीच्या प्रचार प्रस्तारासाठी काव्य रचना केली. "कृष्णराव भालेकरांनी, राघु गाडीवानाचा पोवाडा, शेतकऱ्याचे मधूर गायन इ. काव्यरचनेतून तत्कालिन ग्रामीण जीवनातील अज्ञान, भयंकर दुष्काळ शेतकऱ्यांचे सावकारांकडून होणारे शोषण, कष्टकऱ्यांच्या, मजूरांच्या असहाय्य जीवनाचे चित्रण करणारी, शोषणातून ग्रामीण जीवनाच्या पोखरलेल्या समाजस्तराचे वास्तव आणि विद्रोही चित्रण करणारी भालेकरांची ग्रामीण कविता भेदक आणि झुंजारवृत्तीची आहे हे निर्विवाद.(3)

ग्रामीण आणि कृषिजीवनाच्या व्यथापूर्ण वास्तव जीवनानुभुती, सत्यशोधक चळवळीतील मुकुंदराव पाटील, मोतिराम तुकाराम वानखडे इ. अनेक सत्यशोधकांनी चळवळीसाठी लिहिलेल्या कवितेतून समाजासमोर परखडपणे मांडल्या, अर्थात ग्रामीण कवितेच्या पाऊलखुणा परखड विद्रोही स्वरूपाच्या होत्या. कालांतराने सत्यशोधक चळवळ बऱ्याच अंशी स्वातंत्र्यलढयामध्ये विलीन होऊ लागली. त्यांच्यातील ग्रामीण विद्रोह स्वातंत्र्य लढयासाठी उपयुक्त ठरेल या उद्देशाने म. गांधी यांनी शहरवासीयांना केलेल्या 'खेडयाकडे वळा' या आवाहनानुसार उच्चशिक्षित शहरीयुवक ग्रामीण परिसरात गेले. त्यांच्यावर ग्रामसंस्कृतीचा गंभीर परिणाम झाला पण कसदार ग्रामीण जीवनानुभूतीची जाणीव त्यांना झाली होती असे म्हणता येणार नाही. त्यांच्या मनात या संदर्भात जागृत झालेल्या नव्या ग्रामीण जाणीवेतून त्यांच्या बद्दल सहानुभूतीची पार्श्वभूमी तयार झाली. ग्रामीण जीवनाच्या नवतेचा मोह निर्माण झाला पण ग्रामसमाजजीवनाबद्दल कळवळा आणि अस्वस्थतेचा अभाव होता.

## 3) ग्रामीण कविता – वाटचाल

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात म. गांधी, सरदार वल्लभभाई पटेल इ. राष्ट्रीय नेत्यांमध्ये कृषीसंस्कृतीबद्दल आदरभाव होता. म. गांधी यानी इ.स. 1916 साली बनारस विद्यापीठात केलेल्या जगप्रसिध्द भाषणातून सरकारसह आपण सर्वांनीच शेतकऱ्यांची लुबाडणुक आणि पिळवणुक थांबविली पाहिजे तरच आपल्या देशाला खरे स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येईल हे परखडपणे सांगितले आहे. पुढे ही शेतकरी चळवळ सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपणाकडे घेतली. त्यांना न्याय मिळवून दिला. भारतीय जीवनात याच दरम्यान इ.स. 1922 साली साम्यवादाचा प्रवेश झाला. इ.स. 1925 मध्ये कानपूरयेथे कम्युनिस्ट कॉन्फरंन्स भरली. याचवेळी आपल्या देशात साम्यवादाचे लोण पोहोचल्याचे जाहीर झाले. गांधीवाद, साम्यवाद आणि समाजवाद यांच्या समन्वयातून एक कणखर विचार प्रवाह पुढे आला तो म्हणजे भारतीय शेतकरी आणि हजारो खेडयातून पसरलेली दारिद्री, अज्ञानी, पददलित सामान्य जनता यांच्या दारिद्रयाच्या आणि उपासमारीचा प्रश्न सोडविला पाहिजे. या जाणीवा हळुहळु विस्तारत गेल्या. मराठी साहित्यामध्ये त्याचे प्रतिबिंब पडणे अपरिहार्यच होते. त्याचाच एक भाग म्हणून इ.स. 1940 पासून शेतकरी जीवनाशी संबंधित असणाऱ्या ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागली. ग्रामीण परिसराविषयी मराठी साहित्यिकात औत्सुक्य निर्माण झाले. यालाच 'जानपद साहित्य ही संज्ञा प्राप्त झाली. मराठी ललित साहित्यामध्ये ग्रामीण जीवन लोकप्रिय झाले. त्याचे मुख्य कारण आधुनिक जानपद कविता होय. इंग्रजीतील वर्डस्वथ यांच्या 'सॉलिटरी रिपर' यासारख्या कवितावरून घेतलेल्या ग्रामीण जीवनप्रधान निसर्ग कविता अनेक मराठी कवींनी लिहिलेल्या आहेत. अर्थात ग्रामीण कवितेची वाटचाल सुरू असताना तत्कालीन इंग्रजी कवितेचा प्रेरणादाई प्रभाव ग्रामीण कवितेवर होता. 'ग.ल. ठोकळ हे थॉमस हार्डीपासून प्रेरणा मिळाल्याचे कबूल करतात.(4) चंद्रशेखरनी 'ससेकस मिरॅकल' चे 'काय हो चमत्कार' हे रूपांतर केले याच दरम्यान रविकिरण मंडळातील कवींनी ग्येयतेवर भिस्त ठेवून एखादा विशय भावनेत बुडवून सजवून समाजासमोर मांडण्याचा सपाटा सुरू केला. त्यांच्या या प्रवृत्तीवर नुक्तीच आकारला येणाऱ्या ग्रामीण

कवितेचा प्रभाव पडला. ग्रामीण कवितेला फार मोठे सांस्कृतिक अधिष्ठान मिळाले होते. ग्रामजीवनातील गावगाडा, परंपराप्रियता, लोकरूढी, जत्रा, देवधर्म यासारख्या परंपरेने चालत आलेल्या सांस्कृतिक जाणीवांचे रविकिरण मंडळातील कवींना आकर्षण वाटले आणि बदलत्या कालानुरूप मराठी काव्यप्रांतामध्ये ग्रामीण कवितेचा मोहरा उमटू लागला.

**अ) आरंभिक ग्रामीण जानपद कविता –**

साहित्य ही व्यक्तिमनाची निर्मिती असली तरी निर्मितीच्या क्षणी ते केवळ व्यक्तिमन उरलेले नसते. ते ही जणू जनमनाचाच एक अंश बनलेले असते. म्हणूनच साहित्य निर्मिती ही व्यक्तिमनाने जनमनाशी साधलेला संवाद ठरतो. तो जननिष्ठ असतो कवींच्या माध्यमातून ती जननिष्ठ भावरम्यता अभिव्यक्त होते म्हणूनच त्याला जानपद कविता असे म्हटले जाते." साहित्याची ही जननिष्ठ प्रकृती लक्षात घेतली तर मौखिक लोकसाहित्य हे देखील जनसाहित्य ठरते.(5) हे डॉ. रवींद्र ठाकूर यांचे मत सार्थ वाटते शिवाय जानपद कविता लोकगीताचेच एक विकसित रूप वाटते. या जानपद कवितेमध्ये पांढरपेशा जीवनाभोवती फिरणाऱ्या मराठी कवितेचा ग्रामीण जीवनाचा नवा आषय देण्याचा प्रयत्न कवी चंद्रशेखर यांनी केला. मराठीत ग्रामजीवनाचे चित्रण आणि ग्रामीण बोलीचा वापर चंद्रशेखरनीच केला. ग. ल. ठोकळ यांनी 'सुगी' हा जानपद गीताचा पहिला प्रातिनिधिक संग्रह इ.स. 1933 मध्ये संपादित करून बडोदा येथून प्रसिध्द केला यामध्ये विविध पस्तीस कवींच्या चव्वेचाळीस कविता आहेत. खेडयाचे वर्णन, शेती संस्कृती, ग्रामीण स्त्री वर्णन, शेतीमशागत, पेरणी, नांगरणी, ग्रामीण आचारविचार प्रेमभाव इ. भावनांचे अस्सल ग्रामीण वर्णन येते. ग. ल. ठोकळ यांच्या 'मीठभाकरी' या स्वतंत्र ग्राम जीवनावरील काव्य संग्रहातून अनुभवांचा सच्चेपणा आढळतो. कवी गिरीश यशवंत, ग. ह. पाटील यांचे अनुकमे भलरीगीत, न्याहरीचे गाणे 'रानजाई' इ. काव्यरचनेतून कुणाबाऊ भाशेतून भावरम्यतेबरोबर खेडयातील निसर्ग, रम्य बालपण आणि ग्रामीण जीवनाकडे मागे वळून पाहण्याचा श्रध्दाशील दृष्टीकोण जाणवतो.

ग्रामीण जानपद कविता बदलत्या कालानुरूप अस्सल ग्रामीण वळण धारण करु लागली. इ.स. 1955 ते 1960 या काळात ग्रामीण साहित्याला प्रचंड लोकप्रियता लाभली. या कालखंडात इ.स. 1952 मध्ये बहिणाबाईची गाणी वाचकासमोर आली त्यावेळी एखाद्या शेतात मोहराचा हंडा अचानक सापडावा असा आनंद झाला. बहिणाबाईचे काव्य प्रसिध्द करण्याबाबत प्र. के. अत्रे बहिणाबाईचा मुलगा कवी सोपान चौधरी यांना म्हणाले, 'अहो हे बावनकशी सोनं आहे. हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा ठरेल.(6) बहिणाबाईची कविता प्रकाशित झाली आणि ग्रामीण जानपद गीतांना नवे वळण घेतले. त्यांच्या कवितेतून ग्रामीण कृषीजीवनातील अस्सल अनुभव वाचक मनाला भिडला. ग्राम अनुभूतीबरोबर ग्रामीण व्यक्तींची प्रत्ययकारी व्यक्तिचित्रे मातीतून उगवल्यासारखी रेखाटली. बहिणाबाईची कविता जानपदगीताला व ग्रामीण कवितेला जोडणारा दुवा ठरतो.(7)

**ब) साठोत्तरी ग्रामीण कविता –**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये साधारणपणे एकोणिसशे साठ नंतर सर्वच वाड्.मयप्रकारातून नवेपणा जाणवू लागला. ग्रामीण कवितेबाबत डॉ. आनंद यादवांनी जानपद गीतातून व्यक्त होणाऱ्या जीवनानुभवाच्या कृतक अनुभवाला समांतर जाणारी कविता लिहावी असे ठरविले. त्यांनी 'हिरवे जग' (1960) आणि 'मळयाची माती' (1978) या ग्रामीण काव्य संग्रहातून ग्रामीण स्वानुभूती अस्सल स्वरूपात सादर केली. यादवांच्या 'हिरवे जग' मधील कविता आणि बहिणाबाईची कविता यामध्ये विशयसाम्य आढळते. ''बहिणाबाईच्या कवितेनंतर 'हिरवे जग' मध्येच वाचकाला ग्रामीण जीवनानुभवाचा अस्सल अविश्कार आढळला.(8) 'हिरवे जग' या आनंद यादवांच्या काव्यसंग्रहाच्या उत्स्फूर्त स्वागतामुळे महाराश्ट्रात ग्रामीण काव्य लेखनाची लाट उसळली म्हणूनच डॉ. आनंद यादव अस्सल ग्रामीण कवितेचा प्रणेता ठरतात.



ना. धों. महानोर यांनी ग्रामीण कवितेची अस्सलता अधिक वाढविली. त्यांची कविता गावापेक्षा शेतात अधिक रमते. याशिवाय शेतातील निसर्ग, नद्या, ओढे, डोंगर झाडे पिके, पशूपक्षी वारा–माणसे ह्यांची सुख दुःख हळुवारपणे अभिव्यक्त करते. निसर्गाला वाली असते ती समजून घेणे आवश्यक आहे. हे निसर्गाशी लळा लागण्यातूनच व एकरूप आणि पूरक होण्यातूनच शक्य आहे. निसर्गलळयाच्या एकरूपतेबद्दल कवी महानोर म्हणतात.

ह्या शेताने लळा लाविला असा असा की ।
सुख दुःखाशी परस्पराशी हसलो–रडलो. (9)

महानोरांच्या 'रानातल्या कविता', वही, पावसाळी कविता आणि 'अजिंठा' इ. काव्यसंग्रहातून कवीमनांची रानाशी आणि रानातील कष्टकरी माणसे आणि पशुपक्षाशी एकरूपता जाणवते त्यांना आपल्या सुख दुःखाचा विसर रानात होतो. महानोरांनी निसर्गालाच एक देहधारी आकृती मानले आहे.

कवी विठ्ठल वाघ यांनी अपूर्व कल्पनाषक्तीच्या बळावर वऱ्हाडी शब्द संवेदनेतून ग्रामीण जीवनदर्शन तंतोतंत उभे केले आहे. शेतकरी जीवनाचे भाश्यकार फ. म. शहाजिंदे यांनी 'शेतकरी' हे दीर्घ काव्य लिहून मराठी ग्रामीण कवितेत खंडकाव्याच्या प्रवाहाला स्थान मिळवून दिले.(10) त्यांनी आपल्या ग्रामीण कवितेतून महाराष्ट्रातील कृषिकेंद्री समाज व्यवस्थेचा राजकर्त्यांनी स्वार्थापोटी विकास केला नाही. याबद्दल प्रक्षोभ आणि विद्रोह निर्माण केला. कृषिसंस्कृतीबद्दल कळवळा असणाऱ्या इंद्रजित भालेराव, नारायण सुमंत, राजा मुकुंद, माधव थोरात इ. ग्रामीण–कवींनी नवनवी वळणे घेत अस्सल ग्रामजीवन साकारले आहे.

**निष्कर्ष :–**

ग्रामीण कवितेच्या वाटा–वळणांचा वेध घेताना मौखिक लोकसाहित्यातील लोकगीतांपासून, सत्यशोधक चळवळीतील कविता, जानपदगीत, बहिणाबाईची ग्रामीण वळणावरील लोकसाहित्य व संत साहित्याची परंपरा लाभलेली अनुभव संपन्न कविता ही ग्रामीण कवितेची पार्श्वभूमी म्हणजे ग्रामीण कवितेसाठी निसर्गदत्त जिवंत झरा वाटतो. या पार्श्वभूमीवर डॉ. आनंद यादव, ना. धो. महानोर, विठ्ठल वाघ यांनी बहिणाबाईनंतर पुन्हा एकदा ग्रामीण लोकभाशेला साहित्याच्या दरबारात राजवैभव प्राप्त करून दिले. ग्रामीण कवितेमध्ये शेतकऱ्यांच्या भविष्यकाळाचे सुतोवाच करणारा दृष्टेपणा निर्माण होत आहे हे ग्रामीण कवितेचे भरीव यश आहे. नागर कवितेपेक्षाही ग्रामीण कविता भरीव बनते आहे याचा मनोमन आनंद होताना आढळतो.

**संदर्भ :–**

1) ग्रामीण साहित्य विशेषांक, संपा. डॉ. आनंद यादव. जुलै–डिसे. 1980 पृ. 88
2) म. फुले समग्र वाड्.मय, संपा. य. दि. फडके, म.रा.सा.स.मंडळ, मुंबई आ.4, 1991 पृ.72
3) आधुनिक मराठी ग्रामीण कविता, डॉ. सौ. हेमलता गायकवाड, फडके प्रकाशन, कोल्हापूर आ. (1) 1997 पृ. 65
4) तत्रैव, उनि पृ. 48
5) चर्चा आणि चिकित्सा,डॉ. रवींद्र ठाकूर, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, आ. 1 नोव्हे. 2011 पृ. 145
6) बहिणाबाईची गाणी, बहिणाबाई चौधरी, संपा. सोपान चौधरी,सुचित्रा प्रकाशन, मुंबई, सन 2004 पृ. 6
7) आधुनिक मराठी ग्रामीण कविता – उनि. पृ. 77
8) साहित्यिक आनंद यादव, डॉ. रवींद्र ठाकूर, बळीवंश प्रकाशन, नांदेड, आ. 1 8 जून 2011 पृ. 106
9) पक्षांचे लक्ष थवे, ना. धो. महानोर, संपा. उत्तम क्षीरसागर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई आ.1 1991 पृ.25
10) आधुनिक मराठी ग्रामीण कविता – उनि. पृ. 84